"उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहीम
कृषि यांत्रिकीकरण- मार्गदर्शक सुचना
ई मेल - ddainputs5@gmail.com

जा.क्र.उशेसशे/कृषि.यांत्रि/२०१८-१९/२५७/२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
दिनांक :- १४ जुन, २०१८

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक............................ (सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, .......................(सर्व)

**विषय : "उन्नत शेती - समृध्द शेतकरी" मोहिमेंतर्गत यांत्रिकीकरण घटकाची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपध्दती बाबत मार्गदर्शक सुचना (अंतरिम).**

संदर्भ : शासन निर्णय क्र. ०४१८/प्र.क्र.१५५/१४-अे, मुंबई, दि.२७/०४/२०१८

सन २०१७-१८ मध्ये 'उन्नत शेती-समृध्द शेतकरी' या मोहिमेंतर्गत कृषि यांत्रिकीकरणास मोठ्या प्रमाणात चालना देण्याचे दृष्टीने शासनाने भरीव निधी उपलब्ध करुन दिला होता. सन २०१८-१९ मध्येही कृषि यांत्रिकीकरणास मोठ्या प्रमाणात चालना देण्याचे दृष्टीने शासनाने भरीव निधी उपलब्ध करुन देण्याचे शासनाने ठरविले आहे. कृषि यांत्रिकीकरण या घटका करिता सर्व योजनांचा मिळून एकत्रितपणे प्राप्त होणारा निधी लक्षात घेऊन याही वर्षी यांत्रिकीकरणाचा कार्यक्रम राबवावयाचा आहे. याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४.५ मध्ये दिलेल्या आहेत. त्यानुसार, लाभार्थी निवडीपासून त्यांना अनुदान वाटप करणेपर्यंत अवलंबावयाची कार्यपद्धती खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे.

अर्ज प्राप्त झाल्यानंतरची कार्यवाही :-

१.१ सर्व योजनांतर्गत यांत्रिकीकरणासाठी प्राप्त होणाऱ्या एकुण निधीपैकी ट्रॅक्टर करिता ४०% व कृषि यंत्र / औजारांसाठी ६० % निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे, तालुका कृषि अधिकारी यांनी तालुक्यास अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त झालेल्या अर्जांचे प्रथमत: ट्रॅक्टर व यंत्र /औजारांचे स्वतंत्र वर्गीकरण/ गठ्ठे करावे, आणि त्यानंतर ट्रॅक्टर व यंत्र / औजारांकरिता प्राप्त अर्जांचे प्रवर्ग निहाय (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, खुला) विवरण तयार करून त्यावर प्राप्त अर्जांची यादी लावावी.

१.२ तालुका कृषि अधिकारी कार्यालयात उपरोक्त नुसार वर्गीकरण केलेले सर्व अर्ज जास्तीत जास्त ७ दिवसात संबंधीत उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे पोहोच होतील याची दक्षता तालुका कृषि अधिकारी यांनी घ्यावी.

१.३ तालुका कृषि अधिकारी यांनी उपविभागीय कृषि अधिकारी यांना पाठविलेल्या अर्जांची यादी तालुका कृषि अधिकारी कार्यालयात दर्शनी भागात लावावी जेणेकरुन सर्व शेतक-यांना आपले नाव सोडतीसाठी उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालयास पाठविले असल्याची खात्री होईल.

१.४ उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तालुका निहाय ट्रॅक्टर व यंत्र /औजारांसाठी प्राप्त अर्जांची यादी प्राप्त झाल्याची खातरजमा करुन त्याची दिनांकित पोहोच तालुका कृषि अधिकारी यांना दयावी तसेच, उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या कार्यालयातील दर्शनी भागात सदर याद्या प्रसिद्ध कराव्यात.

## २. लक्षांक वाटप :-

### २.१ जिल्हा निहाय लक्षांक निश्चिती:

प्रथमत: सर्व योजनातील यांत्रिकीकरणाच्या बाबीकरिता उपलब्ध होणारा एकूण निधी विचारात घेऊन राज्य स्तरावरुन जिल्हयांना आर्थिक लक्षांक वाटप पुढील निकषांच्या आधारे करण्यात येईल.

१. सर्व जिल्ह्यांना 'खातेदारांची संख्या' या प्रमुख निकषांवर प्रचलीत योजनांतर्गत यांत्रिकीकरण घटकासाठी एकूण आर्थिक लक्षांकातून जिल्हानिहाय लक्षांक देण्यात येईल.

२. सर्व योजनांतर्गत यांत्रिकीकरणासाठी उपलब्ध होणारा निधी हा राज्याचा एकूण आर्थिक लक्षांक राहील.

३. राज्याच्या या एकूण आर्थिक लक्षांकाचे राज्यातील विविध प्रवार्गांच्या खातेदारांच्या संख्येच्या प्रमाणात प्रथमत: राज्यस्तरावर वाटप करण्यात यावे. प्रवर्गनिहाय वाटप करताना सध्यस्थितीत प्रचलीत योजनांतर्गत केंद्र शासनाने ज्या प्रमाणात प्रवर्गनिहाय निधी वितरीत केला आहे, त्याच प्रमाणात प्रवर्गनिहाय निधी वितरीत करुन खर्च करण्यात यावा.

४. तद्नंतर, प्रत्येक जिल्ह्यातील खातेदारांच्या एकूण संख्येचे राज्यातील एकूण खातेदारांच्या संख्येशी असलेले प्रमाण, हा त्या जिल्ह्याला यांत्रिकीकरणाकरिता लक्षांक वाटपाचा निकष राहील आणि त्याप्रमाणात, एकूण आर्थिक लक्षांकातून प्रत्येक जिल्ह्यास यांत्रिकीकरणाकरिता एकूण आर्थिक लक्षांक वाटप करण्यात येईल.

५. प्रत्येक जिल्ह्यास यांत्रिकीकरणाकरिता लक्षांक वाटप करतेवेळी संबंधित जिल्ह्यातील खातेदारांच्या एकूण संख्येमध्ये सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे जेवढे प्रमाण असेल त्याप्रमाणात, राज्य स्तरावर प्रवर्ग निहाय निश्चित केलेल्या एकूण लक्षांकातून सर्व जिल्ह्यांना प्रवर्ग निहाय लक्षांक मंजूर करण्यात येईल.

२.२ तालुका निहाय लक्षांक वाटप :-

१. यांत्रिकीकरणासाठी जिल्ह्यास प्राप्त होणा-या एकूण आर्थिक लक्षांकाचे तालुक्यातील खातेदारांच्या संख्येच्या प्रमाणात तालुका निहाय वाटप करावे. त्याचप्रमाणे, जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात खातेदारांच्या एकूण संख्येमध्ये सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे जेवढे प्रमाण असेल त्या प्रमाणात प्रत्येक तालुक्यांना प्रवर्ग निहाय लक्षांक मंजूर करण्याची कार्यवाही जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांनी करावी.

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्यास यांत्रिकीकरणासाठी प्रवर्ग निहाय निश्चित करून दिलेल्या आर्थिक लक्षांकापैकी प्रत्येक प्रवर्गाचा ४०% निधी ट्रॅक्टरसाठी व उर्वरित ६०% निधी यंत्र/औजारांकरिता आर्थिक लक्षांक म्हणून त्या-त्या प्रवर्गासाठी निश्चित करून द्यावा.

३. तालुक्यांतर्गत ट्रॅक्टर आणि यंत्र/औजारांकरिता प्रवर्ग निहाय आर्थिक लक्षांक निश्चित केल्यानंतर, या तिन्ही प्रवर्गासाठी प्राप्त झालेल्या आर्थिक लक्षांकापैकी ३०% निधी त्या - त्या प्रवर्गातील महिला लाभार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात यावा, व उर्वरित ७०% निधी त्या - त्या प्रवर्गातील पुरुष / महिला लाभार्थ्यासाठी उपलब्ध असेल.

## ३. लाभार्थी निवडीची कार्यपध्दती :-

जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे सोडतीद्वारे लाभार्थी निवडीचे ठिकाण, दिनांक व वेळ तसेच अर्ज स्विकृती पासून ते सोडतीपर्यंतचे संपूर्ण नियोजन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि उपसंचालक व संबंधीत उप विभागीय कृषि अधिकारी यांनी करावयाचे आहे. तसेच ज्या प्रचलीत योजनांमध्ये मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेने लाभार्थी निवड करावयाची आहे, त्या योजनांकरीता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ही सोडत काढण्यास जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची मान्यता घ्यावी व तदनंतर उपविभागीय कृषि अधिकारी यांनी तालुका निहाय सोडत काढावयाची आहे. ज्या तालुक्याची सोडत काढावयाची आहे, त्याची जबाबदारी संबंधित उप विभागीय कृषि अधिकारी, व संबंधित तालुका कृषि अधिकारी यांची राहील. तसेच संबंधीत उप विभागीय कृषि अधिकारी आवश्यकतेनुसार उप विभागातील मंडळ कृषि अधिकारी यांची मदत घेऊ शकतील.

**३.१ लाभार्थी निवडीचे खालीलप्रमाणे दोन टप्पे रहातील -**

**अ. तालुक्यातील सर्व अर्जदारांची सोडतीद्वारे ज्येष्ठता क्रमवारी निश्चित करणे :-**

१. प्रथमत: सोडतीकरिता उपस्थित असलेल्या शेतकरी बांधवाना प्रत्येक तालुक्यास यांत्रिकीकरणासाठी प्रवर्ग निहाय प्राप्त आर्थिक लक्षांकाची व सोडत प्रक्रियेची सविस्तर माहिती द्यावी. तसेच, निवड प्रक्रियेदरम्यान वरचेवर निवडलेल्या लाभार्थ्यांची व प्रवर्ग निहाय शिल्लक राहिलेल्या अनुदानाची माहिती उपस्थित शेतकरी बांधवाना देत राहावी.

२. एका लाभार्थ्याला ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजारांसाठी अनुदान देय आहे. सबब, ट्रॅक्टर करिता प्राप्त झालेल्या सर्व अर्जांतून ट्रॅक्टर करिता स्वतंत्र सोडत काढावी, आणि यंत्र/औजारांकरिता प्राप्त झालेल्या सर्व अर्जांतून यंत्र/औजारांकरिता स्वतंत्र सोडत काढावी.

३. एका अर्जदारास केवळ एकाच यंत्र/औजारांकरिता अनुदान देय आहे, मात्र एक अर्जदार वेगवेगळ्या यंत्र/ औजारांकरिता स्वतंत्र अर्ज करू शकतात. तथापि, एकाच यंत्र/औजारांकरिता अर्जदाराने अनेक अर्ज केले असल्यास त्याचा त्या यंत्र / औजारांकरिता एकच अर्ज सोडत प्रक्रियेकरिता गृहीत धरण्यात यावा. असे करताना, ट्रॅक्टर अथवा यंत्र / औजारांसाठी लाभार्थीने केलेल्या अनेक अर्जांपैकी ज्या ट्रॅक्टर अथवा यंत्र / औजारांसाठी अनुदानाची रक्कम जास्त आहे तो अर्ज सोडतीसाठी गृहित धरुन इतर अर्ज रद्द करण्यात यावेत. सदर बाबीची कल्पना सोडतीकरिता उपस्थित असलेल्या शेतकरी बांधवाना देण्यात यावी.

४. अशाप्रकारे, या दोन स्वतंत्र सोडतीद्वारे ट्रॅक्टर करिता आणि यंत्र / औजारांकरिता अर्ज केलेल्या सर्व अर्जदारांची स्वतंत्रपणे दोन ज्येष्ठता क्रमवारी (Seniority Ranking) निश्चित करून घ्याव्यात. ही सोडत काढताना तालुक्यासाठी प्राप्त झालेल्या आर्थिक लक्षांकाचा विचार करावयाचा नाही. सदर ज्येष्ठता क्रमवारी त्या - त्या आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंतच लागू (valid) राहील व त्या दिवसानंतर सदर ज्येष्ठता क्रमवारी अपोआप रद्द होईल.

५. अशाप्रकारे, तालुक्यातून प्राप्त सर्व अर्जदारांचा त्यांनी ज्या बाबीसाठी (ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजारे) अर्ज केला असेल, त्या बाबी करिताच्या ज्येष्ठता क्रमवारीत समावेश असेल व त्यांना सोडतीद्वारे मिळालेला ज्येष्ठता क्रमांक देखील माहीत राहील.

**आ. प्रवर्ग निहाय आर्थिक लक्षांकाच्या मर्यादेत ज्येष्ठता क्रमवारीतून लाभार्थ्यांची निवड करणे :-**

१. ट्रॅक्टर व यंत्र/औजारांकरिता निश्चित केलेल्या अर्जदारांच्या दोन स्वतंत्र ज्येष्ठता क्रमवारीतून लाभार्थ्यांची निवड करावयाची आहे. सदर निवड प्रक्रिया उप विभागीय कृषि अधिकारी यांनी यथाशिघ्र तालुका निहाय राबवावयाची आहे.

२. तालुका निहाय निवड प्रक्रिया राबवितेवेळी प्रथमत: ट्रॅक्टरसाठी व नंतर यंत्र/औजारांकरिता निवड प्रक्रिया राबविण्यात यावी व त्याकरिता निश्चित केलेल्या अर्जदारांच्या ज्येष्ठता क्रमवारीतून लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी.

३. ट्रॅक्टरसाठी व यंत्र/औजारांच्या ज्येष्ठता क्रमवारीतून लाभार्थ्यांची क्रमा-क्रमाने निवड करण्यात यावी. असे करताना, निवडलेला लाभार्थी ज्या प्रवर्गाचा असेल त्या प्रवर्गासाठी ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजारांसाठी निश्चित केलेल्या आर्थिक लक्षांकातून लाभार्थ्याने पसंती दर्शविलेल्या ट्रॅक्टरसाठी अथवा यंत्र/औजारांसाठी देय असलेले अनुदान वरचेवर वजा करत रहावे.

४. ज्येष्ठता क्रमवारीतून लाभार्थ्यांची क्रमा-क्रमाने निवड करतेवेळी महिला लाभार्थी ज्या प्रवर्गातील असतील त्यांना प्रथमतः त्या-त्या प्रवर्गातील महिला लाभार्थ्यांसाठी निश्चित केलेल्या आर्थिक लक्षांकातून अनुदान देण्यात यावे, आणि त्या-त्या प्रवर्गातील महिला लाभार्थ्यांसाठीच्या लक्षांकाची पूर्तता झाल्यानंतरही जेष्ठता क्रमवारीनुसार महिला लाभार्थी उपलब्ध झाल्यास, त्यांना संबंधित प्रवर्गातील पुरुष/महिला लाभार्थ्यांसाठीच्या लक्षांकातून अनुदान देण्यात यावे.

५. ज्येष्ठता क्रमवारीतून लाभार्थ्यांची क्रमा-क्रमाने निवड करतेवेळी अनुसूचित जाती व जमातींच्या लाभार्थ्यांना प्रथमत: त्यांच्या प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या आर्थिक लक्षांकातून अनुदान देण्यात यावे, आणि त्या-त्या प्रवर्गाचा आर्थिक लक्षांक पूर्ण झाल्यानंतरही जेष्ठता क्रमवारीनुसार अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थी उपलब्ध झाल्यास, त्यांना सर्वसाधारण प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या लक्षांकातून अनुदान देण्यात यावे. असे करताना, सदर लाभार्थी महिला असल्यास त्यास सर्वसाधारण महिलांसाठी शिल्लक असलेल्या लक्षांकातून अनुदान देण्यात यावे, अन्यथा त्यांना सर्वसाधारण पुरुष/महिला लाभार्थ्यांसाठीच्या शिल्लक लक्षांकातून अनुदान द्यावे.

६. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील प्रवर्गासाठी निश्चित केलेला निधी केवळ त्याच प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी वापरता येईल.

७. ज्येष्ठता क्रमवारीमध्ये पुरेशा प्रमाणात महिला लाभार्थी उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील पुरुष लाभार्थीची सोडतीद्वारे निश्चित केलेल्या ज्येष्ठता क्रमवारीतील क्रमानुसार निवड करावी.

८. अशाप्रकारे, ज्येष्ठता क्रमवारीनुसार लाभार्थ्यांची ट्रॅक्टर व यंत्र/औजारांकरिता निवड करण्यात यावी आणि जेंव्हा त्या प्रवर्गासाठीचे अनुदान लक्षांक शून्य अथवा अत्यल्प शिल्लक राहील ज्यातून उर्वरित अर्जदारांना अनुदान अदा करणे शक्य नसेल, त्यावेळी निवड प्रक्रिया त्या अनुदान लक्षांकापर्यंत पूर्ण झाल्याचे तसेच, उर्वरित अर्जदार प्रतीक्षा यादीत राहतील, असे जाहीर करावे.

९. कृषि यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजारांच्या खरेदीसाठी कुटुंबातील (कुटुंब म्हणजे आई-वडील व त्यांच्यावर अवलंबुन असलेली अविवाहीत अपत्य) एकापेक्षा जास्त सदस्यांची सोडतीमध्ये नावे आल्यास, त्यातील कोणत्याही एका सदस्यास यथास्थिती, ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजाराच्या खरेदीसाठी अनुदान देय राहील. त्याकरीता कुटुंबातील सदस्यांपैकी ज्या सदस्यांची नावे वगळायची आहेत त्यांच्याकडून नावे वगळण्याबाबत लेखी संमतीपत्र घेण्यात यावे.

१०. कुटुंबातील आई-वडील अथवा त्यांच्यावर अवलंबुन असलेल्या अविवाहीत अपत्यांच्या नावे ट्रॅक्टर असल्यास आणि सदर कुटुंबातील अन्य सदस्याने ट्रॅक्टर चलीत यंत्र/औजारांसाठी अर्ज केला असल्यास अशा लाभार्थ्यांना सदर यंत्र / औजारांच्या खरेदीसाठी अनुदान अनुज्ञेय राहील, या करीता संबंधीत लाभार्थ्यास कुटुंबातील सदस्यांच्या नावावर ट्रॅक्टर असल्यास पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

११. यथावकाश, इतर तालुक्यातून अथवा अन्य जिल्ह्यातून निधी उपलब्ध झाल्यास प्रतीक्षा यादीतील लाभार्थ्यांची उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत प्रवर्ग निहाय उपरोक्त कार्यपद्धती नुसारच निवड करावी.

### ४. उद्दिष्टा इतके अर्ज प्राप्त न झाल्यास करावयाची कार्यवाही :-

१. तालुक्यामध्ये नेमून दिलेल्या उद्दिष्ठांइतके अर्ज प्राप्त न झाल्यास त्या तालुक्यासाठी पुन:श्च जाहिरात देवून अर्ज मागवावेत आणि प्राप्त होणा-या अर्जातून लाभार्थी निवडीसाठी उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करावी.
२. तालुक्यामध्ये दुस-यांदा संधी देवूनही लक्षांकाएवढे अर्ज प्राप्त न झाल्यास, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी संबंधित तालुक्याच्या शिल्लक निधीचे फेर-वाटप त्या जिल्हयामधील निधीची मागणी असलेल्या अन्य तालुक्यांना, त्यांच्या मूळ लक्षांकाच्या प्रमाणात करावे. सदरची कार्यवाही १५ ऑगस्ट पूर्वी पूर्ण होईल हे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पहावे.
३. त्याचप्रमाणे, जिल्हयाचा निधी शिल्लक राहत असल्यास, प्रथमत: त्याच प्रादेशिक कृषि विभागातील अन्य जिल्ह्यास निधीचे फेर-वाटप विभागीय कृषि सह संचालक यांनी जिल्ह्यांच्या लक्षांकाच्या प्रमाणात करावी.
४. प्रादेशिक कृषि विभागातील काही जिल्ह्यांचा निधी फेर-वाटपानंतरही शिल्लक राहिल्यास, सदर निधी राज्यस्तरावरून निधीची मागणी असलेल्या अन्य विभागातील जिल्ह्यांना, त्यांच्या मूळ लक्षांकाच्या प्रमाणात वाटप करण्यात येईल. असे करताना, लातूर व औरंगाबाद कृषि विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमत: सदर निधी मराठवाड्यामध्ये उपलब्ध करून दिला जाईल. तसेच, अमरावती व नागपूर विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमत: विदर्भामध्ये उपलब्ध करून देण्यात येईल, आणि पुणे व कोल्हापूर विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमत: पुणे महसूल विभागात उपलब्ध करून देण्यात येईल. नाशिक कृषि विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमत: सदर निधी खानदेश विभागामध्ये उपलब्ध करून दिला जाईल. ठाणे कृषि विभागातील निधी शिल्लक असल्यास, प्रथमत: सदर निधी कोकण विभागात उपलब्ध करून दिला जाईल. सदर कार्यवाही जिल्ह्यांच्या लक्षांकाच्या प्रमाणात कृषी आयुक्तालय स्तरावरुन संबंधीत कृषि संचालक यांचेकडून करण्यात येईल.
५. तालुक्यांतर्गत/जिल्ह्यांतर्गत/महसूल विभागांतर्गत लक्षांकाचे फेर-वाटप करतेवेळी ट्रॅक्टरचा निधी ट्रॅक्टरकरिता, आणि यंत्र/औजारांकरिताचा निधी यंत्र/औजारांकरिताच विनियोगात आणता येईल.

### ५. लाभार्थी निवडीनंतर करावयाची कार्यपध्दती :-

सोडतीच्या दिवशी उपस्थित असलेल्यापैकी ज्या शेतकऱ्यांची लाभार्थी म्हणून निवड झाली असेल, त्यांना त्यांच्या निवडी बाबतचे पत्र (पूर्व-संमती पत्र नाही) तालुका कृषि अधिकारी यांनी सोडतीच्या दिवशीच दयावयाचे आहे, आणि अनुपस्थित असलेल्या लाभार्थ्यांना त्यांच्या निवडी बाबतचे पत्र संबंधित गावच्या कृषि सहाय्यकामार्फत घर पोहोच करावयाचे आहे. या पत्रामध्ये लाभार्थ्याने खालील कागदपत्रे सादर करण्याबाबत कळवावयाचे आहे (लाभार्थी निवड पत्र प्रपत्र-१).
१) लाभार्थ्याचा ७-१२ व ८-अ चा उतारा.
२) जे यंत्र/औजार खरेदी करावयाचे आहे त्याचे कोटेशन व केंद्र शासनाची मान्यता प्राप्त असलेल्या तपासणी संस्थेचे परिक्षण (Testing) प्रमाणपत्र / पुरावा. (मान्यता प्राप्त तपासणी संस्थांची यादी सोबत जोडली आहे. (प्रपत्र-५))
३) लाभार्थी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील असल्यास वैध अधिका-याचे प्रमाणपत्र.
४) आधार संलग्न बँक खाते क्रमांक बँक पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स.
५) आधार कार्डाची झेरॉक्स (नसल्यास आधार कार्डाची मागणी केलेल्या पावतीची झेरॉक्स)
६) लाभार्थ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक.

उपरोक्त सर्व कागदपत्रासह प्रस्ताव लाभार्थ्याने मंडळ कृषि अधिकारी/तालुका कृषि अधिकारी यांना १० कार्यालयीन दिवसात सादर करावयाचा आहे.

### ६. पूर्व-संमती :-

१. लाभार्थ्यांच्या निवडीनंतर त्यांनी दिलेल्या प्रस्तावाची पडताळणी झाल्यानंतर, तो लाभार्थी, आणि घेऊ इच्छित असलेले ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजार अनुदानास पात्र ठरते किंवा नाही याची तालुका कृषि अधिकारी यांनी पूर्ण खात्री करावी.

२. शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण यंत्र/औजारांचा पुरवठा व्हावा म्हणून शेतकऱ्यांनी केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम संस्थांनी ज्या कृषि यंत्र/औजारांचे रीतसर परिक्षण (Testing) करुन ते BIS अथवा अन्य सक्षम संस्थांनी निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार (Standards/Specification) असल्याचे प्रमाणित केले असेल अशाच यंत्र/औजारांना पुर्वसंमती प्रदान करावी.

५. अशाप्रकारे, अनुदानास पात्र असल्याबाबत तालुका कृषि अधिकाऱ्यांची खात्री पटलेल्या लाभार्थ्यांना ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजार खरेदी करण्यास पूर्व-संमती दयावी. पुर्वसंमती पत्राचा नमुना सोबत जोडला आहे. (प्रपत्र-२).

४. पुर्वसंमती मिळालेल्या लाभार्थ्यींनी बाजारातील अधिकृत विक्रेत्याकडून यंत्र/औजारांची खरेदी करताना स्वत:च्या बॅन्क खात्यातून इलेक्ट्रॉनिक पध्दतीने/धनादेश/धनाकर्षाद्वारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक राहील.

६. लाभार्थ्याने पूर्व-संमतीनंतर ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजाराची खरेदी करुन खरेदीची पावती मंडळ कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी यांना कमाल ३० कार्यालयीन दिवसामध्ये अनुदान वाटपासाठी सादर करावी.

## ७. मोका तपासणी :-

पूर्व संमती प्राप्त झालेल्या लाभार्थ्याने ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजार खरेदी केल्यानंतर पुन्हा प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही, त्याने केवळ खरेदी पावती मंडळ कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावयाची आहे. मंडळ कृषि अधिकारी यांनी प्राप्त प्रस्ताव तात्काळ तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावा. तालुका कृषि अधिकारी यांनी सदरची पावती ही त्या लाभार्थ्याच्या मूळ प्रस्तावासोबत जोडावी व त्या लाभार्थीने खरेदी केलेल्या ट्रॅक्टर अथवा यंत्र/औजाराची मोका तपासणी करणेबाबत मंडळ कृषी अधिकारी यांना कळवावे. सदर लाभार्थींनी खरेदी केलेल्या औजारांची मोका तपासणी मंडळ कृषी अधिकारी यांनी कमाल १० कार्यालयीन दिवसात करुन अहवाल तालुका कृषि अधिकारी यांना सादर करावा. मोका तपासणी अहवालाचा नमुना सोबत जोडला आहे. (प्रपत्र-३)

## ८. अनुदान मर्यादा :-

कृषि यांत्रिकीकरण उपअभियान व राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण प्रकल्प याकरीता कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाच्या केंद्र शासनाने निर्धारीत केलेल्या अनुदान मर्यादेनुसार अनुदान लाभार्थींना देय राहील. शासन निर्णय दि.२७/०४/२०१८ मधील Basket of implements मध्ये समाविष्ट ट्रॅक्टर/यंत्रे/औजारांबाबत कृषि यांत्रिकीकरण उपअभियान अंतर्गत केंद्र शासनाने निर्धारीत केलेल्या अनुदान मर्यादेचा तपशील सोबत जोडला आहे.(प्रपत्र-६) इतर योजनांच्या बाबतीत संबंधीत योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये नमुद केल्यानुसार कार्यवाही करावी.

## ९. अनुदान वाटप :-

तालुका कृषि अधिका-यांनी प्राप्त मोका तपासणी अहवालांची छाननी करावी. तालुका कृषि अधिकारी यांनी लाभार्थ्यांचे Biometric Verification करावे व तद्नंतर पात्र लाभार्थ्यांना अनुदान अदा करण्याची शिफारस उपविभागीय कृषि अधिकारी यांना करावी. सदर लाभार्थ्यास त्याचे आधार संलग्न बँक खात्यात पीएफ़एमएस प्रणालीद्वारे **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** यांनी अनुदान अदा करावे व त्याप्रमाणे त्याचे भ्रमणध्वनी वर संदेश द्यावा. शासन निर्णय क्र.सुकृऔ-२०१६/प्र.क्र.३०१/११-ऐ, दि.२८/०४/२०१७ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनीयम २०१५ अंतर्गत अनुदानाची रक्कम १५ दिवसांच्या आत लाभार्थींच्या आधार संलग्न बॅन्क खात्यात जमा करायची आहे. त्यानुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे अनुदान उपलब्ध असल्यासच १५ कार्यालयीन दिवसात लाभार्थ्यास अनुदान अदा करण्याचे त्यांच्यावर बंधन राहील, अन्यथा त्यांनी वरिष्ठ कार्यालयाकडे अनुदानाची मागणी करावी.

## १०. ट्रॅक्टर इतर यंत्रे/औजारांचे परिक्षण अहवाल/प्रमाणपत्र/पुरावा सादर करणे -

पुढील नमुद केलेल्या प्रकरणी लाभार्थींनी परिक्षण अहवाल/प्रमाणपत्र/पुरावा सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

अ) कृषि विभागाच्या योजनांतर्गत अनुदानास पात्र ट्रॅक्टर व पॉवर टिलर्सच्या मेक/मॉडेल्सची यादी केंद्र शासन वेळोवेळी सुधारणा करुन निर्गमीत करते. केवळ केंद्र शासनाच्या यादीमध्ये समाविष्ट ट्रॅक्टर व पॉवर टिलर्सच्या मेक/मॉडेल्सलाच अनुदान देय राहील. यास्तव ट्रॅक्टर व पॉवर टीलर्स करीता परिक्षण अहवाल/प्रमाणपत्र/पुरावा सादर करण्याची आवश्यकता

राहणार नाही. अनुदानास पात्र ट्रॅक्टर व पॉवर टीलर्सची यादी कृषि विभागाच्या संकेतस्थळावर (http://krishi.maharashtra.gov.in) तसेच कृषि विभागाच्या सर्व कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

ब) केंद्र शासन वेळोवेळी रिपर, रिपर कम बाईंडर, पॅडी ट्रान्सप्लांटर, थ्रेशर, पॉवर विडर या यंत्रे/औजारांच्या मेक/मॉडेल्सची यादी निर्गमीत करते. सदर यादीमध्ये समाविष्ठ यंत्र/औजारांच्या मेक/मॉडेल्सची खरेदी केल्यास परिक्षण अहवाल/प्रमाणपत्र/पुरावा सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही. अनुदानास पात्र रिपर, रिपर कम बाईंडर, पॅडी ट्रान्सप्लांटर, थ्रेशर, पॉवर विडर्सची यादी कृषि विभागाच्या संकेतस्थळावर (http://krishi.maharashtra.gov.in) तसेच कृषि विभागाच्या सर्व कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

तथापि रिपर, रिपर कम बाईंडर, पॅडी ट्रान्सप्लांटर, थ्रेशर, पॉवर विडर या यंत्रे/औजारांच्या यादीतील मेक/मॉडेल्स व्यतीरीक्त यादीबाहेरील यंत्र/औजारांची खरेदी करण्याचा शेतक-यांचा मानस असल्यास, त्यांनी विक्रेत्यांकडून सदर यंत्र/औजारांबाबत सक्षम संस्थेने दिलेल्या परिक्षण प्रमाणपत्राचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

## ११. औजारांचा तपासणी अहवाल :-

आयुक्तालयाचे पत्र जा.क्र./उत्पादक माहिती/एम्बास/२०१८-१९/२२८/गुनि-५/२०१८, दि.१६/०५/२०१८ अन्वये उत्पादकांना त्यांचे उत्पादीत यंत्र/औजारांवर परिक्षण अहवाल क्रमांक व मॉडेल क्रमांक Emboss करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार संबंधीत कंपनीने यंत्र/औजारांवर परिक्षण अहवाल क्रमांक व मॉडेल क्रमांक Emboss करणे बंधनकारक राहील. तसेच याबाबत मोका तपासणी करतेवेळी मंडळ कृषि अधिकारी यांनी खातरजमा करावी. तसेच पुर्व-संमती प्रदान करतेवेळी याबाबत शेतक-यांना स्पष्ट सुचना देण्यात याव्यात.

## १२. सोडतीच्या प्रक्रियेचे संनियंत्रण -

खाली नमुद अधिका-यांनी सोडतीची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होण्याकरीता संनियंत्रण करावे.

**विभागीय कृषि सहसंचालक** - यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही उपविभागातील एका सोडतीस स्वत: उपस्थित रहावे.

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी** - यांनी त्यांच्या कोणत्याही उपविभागातील एका सोडतीस स्वत: उपस्थित रहावे. उर्वरीत सोडतीस जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयातील वर्ग एक अधिकारी उपस्थित राहतील.

## १३. तपासणी टक्केवारी -

योजनेच्या प्रभवी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण अधिका-यांनी पुढीलप्रमाणे खर्चाच्या प्रमाणात तपासणी करावी. संनियंत्रण तपासणी अहवालाचा नमुना सोबत जोडला आहे. (प्रपत्र- ४)

| अधिकारी | तपासणी टक्केवारी |
|---|---|
| १. विभागीय कृषि सहसंचालक | ०.५ टक्के |
| २. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | १ टक्के |
| ३. उपविभागीय कृषि अधिकारी | ५ टक्के |
| ४. तालुका कृषि अधिकारी | २५ टक्के |

सोबत - प्रपत्र १ ते ४

(व्ही. बी. इंगळे)
कृषि संचालक (नि.व गु. नि.)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत -

१) उपसंचालक आयुक्त कृषि कक्ष, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे- यांना माहितीस्तव.

२) श्री. श्रीकांत चं. आंडगे, अवर सचिव, १४ अे, (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ - यांना माहितीस्तव सविनय सादर.

३) कृषि संचालक (सर्व), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. - यांना माहितीस्तव.

प्रपत्र - १

उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहीम - सन २०१८-१९

लाभार्थी निवडीचे पत्र

जा.क्र. ताकृअ / उशेसशे/यांत्रि./ /२०१८

तालुका कृषि अधिकारी, --------------------,

दिनांक :-

प्रति,

........................................(लाभार्थ्याचे नाव व पत्ता)

**विषय : उन्नत शेती - समृध्द शेतकरी मोहिमेंतर्गत** ......................................(ट्रॅक्टर अथवा यंत्र / औजाराचे नाव लिहावे) **खरेदीकरिता आपली निवड झाल्याबाबत.**

संदर्भ : शासन निर्णय क्र. ०४१८/प्र.क्र.१५५/१४ -अे, दि.२७/०४/२०१८

उपरोक्त विषयान्वये 'उन्नत शेती - समृध्द शेतकरी' या मोहिमेंतर्गत यांत्रिकीकरण या घटकाखाली आपण ...........................( ट्रॅक्टर (...... अश्वशक्ती ) अथवा यंत्र / औजाराचे नाव लिहावे.) खरेदीकरिता अनुदान मिळणेसाठी अर्ज केला होता.

त्यानुसार, दि. ... /.../२०१८ रोजी, राबविलेल्या सोडत प्रक्रियेतून आपली.......... (ट्रॅक्टर (...... अश्वशक्ती ) अथवा यंत्र / औजाराचे नाव लिहावे) करिता .............. प्रवर्गातून निवड झालेली आहे, त्याबद्दल आपले कृषि विभागाकडून हार्दिक अभिनंदन !

उपरोक्त प्रक्रियेतून, आपल्या झालेल्या निवडीच्या अनुषंगाने, आपण .......................... (ट्रॅक्टर (...... अश्वशक्ती ) अथवा यंत्र / औजाराचे नाव लिहावे) च्या खरेदीकरिता पूर्व-संमती मिळविणेसाठीचा आपला प्रस्ताव, खालील कागदपत्रांसह या कार्यालयाकडे पुढील १० कार्यालयीन दिवसात सादर करावा.

१. लाभार्थ्याचा ७-१२ व ८-अ चा उतारा.

२. जे यंत्र/औजार खरेदी करावयाचे आहे त्याचे परिक्षण (Testing) प्रमाणपत्र / पुरावा व कोटेशन.

३. लाभार्थी अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील असल्यास वैध अधिका-याचे प्रमाणपत्र.

४. आधार संलग्न बँक खाते क्रमांक बँक पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स.

५. आधार कार्डाची झेरॉक्स ( नसल्यास आधार कार्डाची मागणी केलेल्या पावतीची झेरॉक्स)

६. लाभार्थ्याचा भ्रमणध्वनी क्रमांक.

**(नाव व स्वाक्षरी)**

**तालुका कृषि अधिकारी,....................**

**तालुका -..................; जिल्हा- .............**

प्रपत्र - २

उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहीम - सन २०१८-१९

लाभार्थ्यांना पूर्व-संमतीचे पत्र

जा.क्र. ताकृअ / उशेसशे/यांत्रि./        /२०१८

तालुका कृषि अधिकारी, -------------,

दिनांक :-

प्रति,

-------------------------------(लाभार्थ्याचे नाव व पत्ता)

विषय : 'उन्नत शेती - समृध्द शेतकरी' मोहिमेंतर्गत -------------------- ( ट्रॅक्टर (----अश्वशक्ती) अथवा यंत्र / औजाराचे नाव लिहावे) च्या खरेदीकरिता पूर्व - संमती प्रदान करणेबाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय क्र. ०४१८/प्र.क्र.१५५/१४ -अे, दि.२७/०४/२०१८

२. या कार्यालयाचे सम क्रमांकित पत्र दि. ------ जून, २०१८.

३. आपला पूर्व - संमती प्रदान करणेबाबत सादर प्रस्ताव दि. ------ जून, २०१८.

उपरोक्त विषयान्वये "**उन्नत शेती - समृध्द शेतकरी** " या मोहिमेंतर्गत यांत्रिकीकरण या घटकाखाली आपण -------------------- ( ट्रॅक्टर (----अश्वशक्ती) अथवा यंत्र / औजाराचे नाव लिहावे) खरेदीकरिता अनुदान मिळणेसाठी अर्ज केला होता व सदर बाबी करिता आपली निवड झाल्याचे या कार्यालयाच्या सम क्रमांकित पत्र दि. ------ जून, २०१८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने, आपण सदर -------------------------- (ट्रॅक्टर (----अश्वशक्ती) अथवा यंत्र / औजाराचे नाव लिहावे) च्या खरेदीकरिता अनुदान मिळणेसाठी आपला प्रस्ताव या कार्यालयास विहित कागदपत्रांसह सादर केलेला आहे.

आपल्या प्रस्तावाची छाननी केली असता आपण अनुदानास पात्र लाभार्थी असल्याची तसेच, आपण खरेदी करू इच्छित असलेले------------------- (ट्रॅक्टर (--अश्वशक्ती) अथवा यंत्र/औजाराचे नाव लिहावे) अनुदानास पात्र असल्याची माझी खात्री झालेली आहे.

**सबब, आपणास सदर ---------------------(ट्रॅक्टर (----अश्वशक्ती) अथवा यंत्र/औजाराचे नाव लिहावे) च्या खरेदी करिता पूर्व -संमती प्रदान करण्यात येत आहे.** तसेच, आपण सादर केलेल्या कोटेशन नुसार खरेदी पश्चात आपणास पुढीलप्रमाणे विवरणानुसार अनुदान शासनाकडून देय राहील.

| ट्रॅक्टर (----अश्वशक्ती) अथवा यंत्र / औजाराचे विवरण | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| कंपनीचे नाव व मॉडेल क्र. | परिक्षण संस्थेचे नाव | परीक्षण अहवाल क्र. | ट्रॅक्टर वा यंत्र / औजार अनुदानास पात्र आहे किंवा नाही. | कोटेशन नुसार किंमत | अनुज्ञेय अनुदानाची रक्कम (अंक व अक्षरी) |
| | | | | | |

आपण, १) तत्काळ उपरोक्त नमूद-------------------------------- (ट्रॅक्टर (----अश्वशक्ती) अथवा यंत्र / औजाराची लिहावे) खरेदी अधिकृत विक्रेत्याकडून करावी. २) सदर यंत्र/औजारांवर संबंधीत कंपनीने त्यांचा परिक्षण झाल्याबाबतचा मॉडेल क्रमांक व सांकेतिक क्रमांक कोरणे (Emboss) बंधनकारक आहे. खरेदी करताना सदर यंत्र/औजारांवर संबंधीत कंपनीने त्यांचा परिक्षण झाल्याबाबतचा मॉडेल क्रमांक व सांकेतिक क्रमांक कोरला/Emboss केला असल्याची खात्री करावी. ३) खरेदी करताना स्वत:च्या बॅन्क खात्यातुन इलेक्ट्रॉनिक पध्दतीने/धनादेश/धनाकर्षाद्वारे विक्रेत्यास रक्कम अदा करणे बंधनकारक राहील.

उपरोक्त नुसार खरेदी करुन खरेदीची पावती या कार्यालयास अथवा मंडळ कृषि अधिकारी कार्यालयास कमाल ३० कार्यालयीन दिवसामध्ये अनुदान वाटपासाठी सादर करावी. जेणेकरून आपल्या आधार संलग्न बँक खात्यावर उपरोक्त नमूद अनुदानाची रक्कम जमा करणे शक्य होईल.

(नाव व स्वाक्षरी)

तालुका कृषि अधिकारी,----------------

तालुका - ................; जिल्हा- ............

प्रपत्र - ३

उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहीम - सन २०१८-१९

कृषि यांत्रिकीकरण : मोका तपासणी अहवाल

१. तपासणी दिनांक :-

२. योजनेचे नाव :-

३. लाभार्थीचे नांव :- ----------------------------------------------------

४. पत्ता- गाव :- ---------------------------, तालुका :- ------------------, जिल्हा :-

दुरध्वनी / मोबाईल क्र. :-

५. लाभार्थी प्रवर्ग अ) क्षेत्रानुसार प्रवर्ग :- ब) सामाजिक प्रवर्ग:-

६. आधार कार्ड क्र. :--------------------------------------------------------------

७. प्रत्यक्ष तपासणीत आढळून आलेल्या यंत्र/औजारांचा तपशील:-

१) यंत्र/औजाराचे तांत्रीक नाव : ............................................

२) यंत्र/औजाराचे उत्पादक कंपनीचे नाव : ............................................

३) यंत्र/औजाराचे पुरवठादाराचे/ विक्रेत्याचे नाव : ............................................

४) यंत्र/औजाराचा मॉडेल/मेक/लॉट क्रमांक व एच. पी. : ..........................................

५) यंत्र/औजाराचा तपासणी अहवाल क्र./BIS प्रमाणपत्र : .......................................

६) यंत्र/औजार खरेदी दिनांक : ............................................

७) यंत्र/औजार प्रत्यक्ष प्राप्त (डिलिव्हरी)दिनांक : ............................................

८) ट्रॅक्टर चलित औजारांसाठी ट्रॅक्टरचा आवश्यक एच.पी . : ........................................

८. बिलाचा व अनुदानाचा तपशील -

| अ.क्र. | औजाराचे तांत्रिक नाव /तपशील | बिलाचा तपशील | | | तपासणी अधिका-याने अनुदानासाठी शिफ़ारस केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | बील क्र. | दिनांक | बीलानुसार खरेदीची रक्कम | |
| १. | | | | | |

९. शेतक-याने खरेदी केलेल्या ट्रॅक्टर/यंत्र/औजाराची रक्कम स्वतःच्या बँक खात्यातुन दिली आहे काय? होय/नाही

असल्यास त्याचा तपशील - इलेक्ट्रॉनिक पद्धतीने / धनादेश / धनाकर्ष -

१०. उत्पादक कंपनीने यंत्र/औजारावर परिक्षण अहवाल क्रमांक व मॉडेल क्रमांक कोरला आहे काय? होय/नाही.

११. शेतक-याने खरेदी केलेले ट्रॅक्टर/यंत्र/औजाराचे मॉडेल/मेक पुर्वसंमती पत्रात नमुद केल्यानुसार आहे काय? होय/नाही.

१२. यंत्रसामुग्री व औजारे यांच्या नोंदणीबाबत, विम्याबाबत, कर भरणा, वॉरन्टीबाबत केलेली कार्यवाही.

वरीलप्रमाणे ट्रॅक्टर / यंत्रे / औजाराची तपासणी मी स्वत: केली असून ट्रॅक्टर / यंत्रे / औजार सुस्थितीत असल्याचे आढळले. योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार देय असलेली अनुदानाची रक्कम रु. ............. (अक्षरी रुपये .......................) शेतकऱ्याचे बँक खात्यात जमा करण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

स्वाक्षरी :-

स्थळ :- अधिकाऱ्याचे नाव :-

दिनांक :- पदनाम :- मंडळ कृषि अधिकारी

मुख्यालय :-

प्रपत्र - ४

उन्नत शेती समृध्द शेतकरी मोहीम - सन २०१८-१९

कृषि यांत्रिकीकरण : संनियंत्रण तपासणी अहवाल

१. तपासणी दिनांक :-

२. योजनेचे नाव :-

३. लाभार्थीचे नांव :- ---------------------------------------------

४. पत्ता- गाव :- -------------------------, तालुका :- ------------------, जिल्हा :-

दुरध्वनी / मोबाईल क्र. :-

५. लाभार्थी प्रवर्ग अ) क्षेत्रानुसार प्रवर्ग :- ब) सामाजिक प्रवर्ग:-

६. आधार कार्ड क्र. :-----------------------------------------------------

७. प्रत्यक्ष तपासणीत आढळून आलेल्या यंत्र/औजारांचा तपशील:-

१) यंत्र/औजाराचे तांत्रीक नाव ..........................................................................

२) यंत्र/औजाराचे उत्पादक कंपनीचे नाव ........................................................

३) यंत्र/औजाराचे पुरवठादाराचे/ विक्रेत्याचे नाव ...................................................

४) यंत्र/औजाराचा मॉडेल/मेक/लॉट क्रमांक व एच. पी. ...........................................

५) यंत्र/औजाराचा तपासणी अहवाल क्र./BIS प्रमाणपत्र क्र. .......................................

६) यंत्र/औजार खरेदी दिनांक - ........................................

७) यंत्र/औजार प्रत्यक्ष प्राप्त (डिलिव्हरी)दिनांक ..........................

८) ट्रॅक्टर चलित औजारांसाठी ट्रॅक्टरचा आवश्यक एच. पी. ..........................

८. बिलाचा व अनुदानाचा तपशील -

| अ.क्र. | औजाराचे तांत्रिक नाव /तपशील | बिलाचा तपशील | | | तपासणी अधिका-याने अनुदानासाठी शिफ़ारस केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| | | बील क्र. | दिनांक | बीलानुसार खरेदीची रक्कम | |
| १. | | | | | |

९. शेतक-याने खरेदी केलेल्या ट्रॅक्टर/यंत्र/औजाराची रक्कम स्वतःच्या बॅंक खात्यातुन दिली आहे काय? होय/नाही :-

असल्यास त्याचा तपशील - इलेक्ट्रॉनिक पधतीने/धनादेश/धनाकर्ष -

१०. उत्पादक कंपनीने यंत्र/औजारावर परिक्षण अहवाल क्रमांक व मॉडेल क्रमांक कोरला आहे काय? होय/नाही.

११. शेतक-याने खरेदी केलेले ट्रॅक्टर/यंत्र/औजाराचे मॉडेल/मेक पुर्वसंमती पत्रात नमुद केल्यानुसार आहे काय? होय/नाही.

१२. यंत्रसामुग्री व औजारे यांच्या नोंदणीबाबत, विम्याबाबत, कर भरणा, वॉरन्टीबाबत केलेली कार्यवाही.

वरीलप्रमाणे ट्रॅक्टर/यंत्रे/औजाराची तपासणी मी स्वत: केली असून ट्रॅक्टर/यंत्रे/औजार सुस्थितीत असल्याचे आढळले. योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार देय असलेली अनुदानाची रक्कम रक्कम रु. ............. (अक्षरी रुपये .......................) शेतकऱ्याचे बॅंक खात्यात जमा करण्यात आली आहे.

स्वाक्षरी :-

स्थळ :-

अधिकाऱ्याचे नाव :-

दिनांक :-

पदनाम :-

मुख्यालय :-